# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (शुल्क व आकार) विनियम, २००४

**विद्युत अधिनियम, २००३**

क्र. मविनिआ/लिगल/१२३/२००४/२२२३ - विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (जी) सह कलम १८१ अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, याद्वारे खालील प्रमाणे विनियम करीत आहे. हे विनियम, "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (शुल्क व आकार) विनियम, २०००" ला अधिक्रमित करतील.

## १ संक्षिप्त नांव व प्रारंभ आणि व्याप्ती

१.१ या विनियमांस "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (शुल्क व आकार) विनियम, २००४" असे म्हणावे.

१.२ हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापसून अंमलात येतील.

१.३ ते, प्रसिद्धीच्या दिनांकास आयोगासमोर प्रलंबित असलेले आणि प्रसिद्धीच्या पूर्वी निकालांत काढण्यात आलेले आणि ज्यासाठी अर्जदाराकडून तात्पुरते शुल्क किंवा आकार प्रदान केला गेला होता किंवा करण्यात येणार होता असे सर्व अर्ज यासह, आयोगाच्या कार्यक्षेत्रातील सर्व बाबींना लागू राहतील.

## २ व्याख्या

२.१ या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर -

(अ) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(ब) **"आयोग"** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(क) **"ग्राहक प्रतिनिधी"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ९४ च्या उप-कलम (३) नुसार ग्राहकांच्या हितांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आयोगाने प्राधिकृत केलेली अशी व्यक्ती;

(ड) **"निधी"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १०३ खाली घटीत केलेला निधी.

२.२ यांत वापरलेले आणि व्याख्या न केलेले शब्द किंवा शब्दप्रयोग यांना अधिनियमांत अनुक्रमे दिल्यानुसार अर्थ राहील.

## ३. अर्ज किंवा याचिकांसाठी शुल्क

३.१ आयोगाकडे केलेल्या प्रत्येक अर्जासोबत या विनियमांतील अनुसूची १ मध्ये विर्निदिष्ट केलेले शुल्क किंवा आकार भरण्यात येईल.

३.२ या विनियमाप्रमाणे अदा करावयाचे शुल्क किंवा आकार "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग" च्या नांवाने काढण्यांत आलेल्या, मुंबई येथे अदा करण्यांत यावयाच्या, धनाकर्षाने किंवा प्रदानादेशाने अथवा रूपये पाच हजार इतक्या रकमेपेक्षा जास्त नसलेली रक्कम रोखीने प्रदान करण्यांत येईल.

३.३ या विनियमाखाली प्राप्त झालेले शुल्क किंवा आकार निधीच्या बॅंक खात्यांत जमा करण्यांत येईल.

परंतु असे की, निधीची जोपर्यंत स्थापना करण्यात येत नाही तोपर्यंत या विनियोगांना अनुसरुन प्राप्त झालेले शुल्क किंवा आकार आयोगाच्या निर्देशीत बॅंक खात्यांत जमा करण्यांत येतील.

३.४ अधिनियमाच्या कलम १४२ आणि कलम १४६ खाली आयोगाने किंवा कलम १४३ खाली अभिनिर्णय अधिका-याने आदेश दिलेला कोणताही दंड, असा दंड आकारणाऱ्या, आयोगाच्या किंवा अभिनिर्णय अधिक-याच्या, जसे असेल तसे, आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आंत, किवा आयोगाने किंवा अभिनिर्णय अधिका-याने, जसे असेल तसे, मान्य केलेल्या वाढीव मुदतीत प्रदान करण्यांत येईल.

३.५ या विनियमील विनियम ३.२ आणि ३.३ मध्ये तरतूद करण्यांत आलेल्या पद्धतीनुसार, दंडाची रक्कम देय राहील व जमा करण्यांत येईल.

## ४. वीज दरामध्ये समावेश करणे

या विनियमाखाली अदा केलेले शुल्क किंवा आकार वीज दराच्या निर्धारणासाठी खर्च म्हणून गणण्याचा परवानाधारकास हक्क राहील.

परंतु असे की, अधिनियमाच्या तरतुदीखाली अदा केलेला दंड वीज दराच्या निर्धारणासाठी खर्च म्हणून परिगणित केला जाणार नाही.

## ५. सुधारणा करण्याचे अधिकार

आयोग, कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याही तरतूदीमध्ये बदल, फेरबदल किंवा सुधारणा करु शकेल.

## ६. अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमांतील कोणत्याही तरतूदीची अंमलबजावणी करताना जर काही अडचणी आल्या तर आयोग, साधारण किंवा विशेष आदेशाने, अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक असेल अशी, अधिनियमांतील तरतुदींशी विसंगत नसणारी, तरतूद करु शकेल.

# अनुसूची १ - शुल्क व आकार

| अ. क्र<br>(१). | तपशील<br>(२) | शुल्क (रुपये)<br>(३) |
|---|---|---|
| १ | अधिनियमाच्या कलम ९ च्या उप-कलम (२) मधील दुस-या परंतुकाखाली पारेषण सुविधा उपलब्ध होण्याबाबतच्या वादावरील अभिनिर्णय, ज्या व्यक्तीने आयोगाकडे असा वाद संदर्भित केला असेल त्याने प्रदान करणे. | पहिल्या १ मे. वॅ. पारेषण क्षमतेसाठी रु. १०,०००/- आणि त्यानंतरच्या प्रति मे. वॅ. साठी रु. १,२५०/- जास्तीत जास्त रु. १,००,०००/- ला अधीन राहून. |
| २ | अधिनियमाच्या कलम १५ खाली परवाना दिल्यावर द्यावयाचे सुरुवातीचे परवाना शुल्क. | रु. ५,००,०००/- |
| ३ | वार्षिक परवाना शुल्क<br>(१) पारेषण परवाना<br>(२) वितरण परवाना<br>(३) वीज व्यापार परवाना<br><br>परंतु असे की, अधिनियमाच्या कलम १४ मधील पहिल्या, दुस-या, तिस-या, चवथ्या व पाचव्या परंतुकामध्ये उल्लेखलेल्या परवानेधारकांसह सर्व परवानेधारकांकडून वार्षिक परवाना शुल्क वित्तीय वर्षाच्या सुरुवातीस आगाऊ प्रदान करण्यांत येईल.<br><br>परंतु पुढे असे की, पारेषण परवान्याच्या बाबतीत, पारेषण करारामधील, आगामी वित्तीय वर्षासाठी मान्यता प्राप्त / अंदाजित क्षमतेच्या एकूण परिमाणाच्या आधारे, वार्षिक परवाना शुल्काची परिगणना करण्यात येईल.<br><br>परंतु आणखी असे की, वितरण परवान्याच्या बाबतीत, आगामी वित्तीय वर्षात वीज विक्रीपासून मिळणाऱ्या, मान्यताप्राप्त / अंदाजित महसुलाच्या आधारे, वार्षिक परवाना शुल्काची परिगणना करण्यात येईल. | (१) किमान रु.१,००,०००/- व कमाल रु.२०,००,०००/- याच्या अधीन राहून, वर्षांमध्ये किंवा त्याच्या काही भागांत अंमलांत असलेल्या पारेषण करारांमधील क्षमतेपैकी प्रति मेगावॅट क्षमतेसाठी रु. १,०००/-.<br>(२) वीजेच्या विक्रीतून मिळणा-या महसुलाच्या (कर व शुल्क (ड्यूटी) वगळून) ०.०५ टक्के.<br>(३) वीजेच्या विक्रीतून मिळणा-या महसुलाच्या (कर व शुल्क वगळून) ०.०५ टक्के. |

| | | |
|---|---|---|
| | परंतु आणखी असे की, वीज व्यापार परवान्याच्या बाबतीत, आगामी वित्तीय वर्षांत वीज विक्रीमधून मिळणा-या मान्यताप्राप्त/ अंदाजित महसुलाच्या आधारे, ज्यांत महाराष्ट्र राज्यांत परवानेधारकास केलेल्या वीज विक्रीपासून मिळणा-या महसुलाचा समावेश नसेल, वार्षिक परवाना शुल्काची परिगणना करण्यांत येईल.<br><br>परंतु आणखी असे की, करारांतर्गत प्रत्यक्ष पारेषण क्षमता किंवा विजेच्या विक्रीतून मिळालेला प्रत्यक्ष महसूल, जसे असेल तसे, या विनियमाच्या प्रयोजनार्थ विचारात घेतलेल्या मान्यताप्राप्त / अंदाजित पातळीपेक्षा निराळा असल्यास, प्रत्यक्षातील करारांतर्गत क्षमतेआधारे किंवा प्रत्यक्षातील महसुलाआधारे, जसे असेल तसे, परिगणना केलेल्या परवाना शुल्कातील आधिक्य किंवा घट आगामी वर्षाच्या वार्षिक परवाना शुल्कांशी समायोजित केली जाईल. | |
| ४ | अधिनियमाच्या कलम १७ खाली पूर्व-मंजूरीसाठीचा अर्ज | किमान रु. ५,००,०००/- व कमाल रु. २०,००,०००/- ला अधीन राहून, ज्या व्यवहारासाठी मंजूरी मागण्यांत आली आहे त्याच्या किंमतीच्या ०.०१ टक्के. |
| ५ | अधिनियमाच्या कलम १८ खाली परवान्यांत सुधारणा करण्यासाठीचा अर्ज<br>(१) परवानाधारकाकडून<br>(२) परवानाधारकाव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीकडून | (१) रु. १,००,०००/-<br>(२) रु. १०,०००/- |
| ६ | अधिनियमाच्या कलम १९ च्या कलम (२) खाली परवाना रद्द करण्यासाठीचा अर्ज<br>(१) परवानाधारकाकडून<br>(२) परवानाधारकाव्यतिरिक्त कौणत्याही व्यक्तीकडून | (१) रु. १०,००,०००/-<br>(२) रु. १,००,०००/- |
| ७ | मधल्या पारेषण सुविधेचा वापर करण्याबाबत अधिनियमाच्या कलम ३५ खाली करावयाचा अर्ज | रु. ५०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ८ | अधिनियमाच्या कलम ३५ च्या परंतुकाखाली अतिरिक्त क्षमतेच्या उपलब्धतेसंबंधीच्या वादाचा अभिनिर्णय | रु. ५,००,०००/-अधिक रु. ५०,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणीसाठी |
| ९ | अधिनियमाच्या कलम ३६ च्या कलम (१) च्या परंतुकाखाली दर, आकार, अटी व शर्ती यांच्या निश्चितीकरणासाठी करावयाचा अर्ज | रू. २,५०,०००/-अधिक रु. ५०,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणीसाठी |
| १० | अधिनियमाच्या कलम २ च्या उप-कलम (४७) सह कलम ४० व त्याखाली विनिर्दिष्ट करण्यांत आलेल्या, परंतु वर समाविष्ट नसलेल्या, विनियमांखालील भेदभावरहित खुल्या प्रवेशाच्या तरतुदीसंबंधीच्या वादाबाबत अभिनिर्णयासाठी करावयाचा अर्ज<br>(१) परवानाधारक किंवा विद्युत निर्मिती कंपनीने केल्यास<br>(२) ज्याने स्व-वापरासाठी वीज निर्मिती प्रकल्प उभारला आहे, देखभाल करतो आहे आणि चालवत आहे अशा व्यक्तीने केल्यास<br>(३) ग्राहकाने/ ग्राहक प्रतिनिधीने केल्यास | (१) रु. ५,००,०००/- अधिक रु. ५०,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणीसाठी<br>(२) रु. २५,०००/-<br>(३) रु. ५,०००/- |
| ११ | अधिनियमाच्या कलम (२) च्या उप-कलम (४७) सह कलम (४२) च्या उप-कलम (२) (३) व (४) आणि त्याखाली विनिर्दिष्ट करण्यांत आलेल्या विनियमांखाली भेदभावरहित खुल्या प्रवेशाच्या तरतुदीसंबंधीच्या वादाबाबत अभिनिर्णयासाठी करावयाचा अर्ज<br>(१) परवानाधारक किंवा खाली (२) मध्ये उल्लेखलेल्या विद्युत निर्मिती कंपनीऐवजी इतर विद्युत निर्मिती कंपनीने केल्यास<br>(२) वितरण परवानधारकाच्या वीज वितरण व्यवस्थेशी थेट जोडलेल्या विद्युत निर्मिती कंपनीने किंवा स्व- वापरासाठी वीज निर्मिती प्रकल्य ज्याने उभारला आहे, देखभाल करतो आहे आणि चालवत आहे अश व्यक्तीने केल्यास<br>(३) ग्राहकाने/ ग्राहक प्रतिनिधीने केल्यास | (१) रु. ५,००,०००/- अधिक रु. ५०,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणी<br>(२) रु. २५,०००/-<br>(३) रु. ५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| १२ | कलम ६२ च्या उप-कलम (१) च्या खंड (ए) च्या तरतुदीखाली वीज दराचे निश्चितीकरण, अर्जदाराने प्रदान करणे | |
| | (अ) पारंपारिक इंधनावर (कोळसा, तेल, इ.) आधारीत प्रकल्प | १०० मेगावॉट पर्यंतच्या क्षमतेसाठी रु. १०,००,०००/- .<br>क्षमतेच्या प्रत्येक वाढीव मेगावॉट किंवा त्याच्या भागासाठी रु. २,५००/- |
| | (ब) सह-वीज निर्मितीसह अपारंपारिक आणि नूतनक्षम ऊर्जा स्त्रोत | पहिल्या १ मेगावॉट क्षमतेसाठी रु. ५०००/-<br>क्षमतेच्या प्रत्येक वाढीव मेगावॉट किंवा त्याच्या भागासाठी रु. १,२५०/- |
| | (क) एखाद्या प्रवर्गांतील प्रकल्पांकरिता वीज दराचे सरसकट निश्चितीकरण | वरील (अ) आणि (ब) करिता देय असलेल्या शुल्क /आकारापैकी, जे लागु असेल ते, सर्वांत कमी रक्कम. |
| १३ | कलम ६२ उप-कलम (१) च्या खंड (बी) च्या तरतुदीखाली वीजेच्या पारेषणासाठीच्या दराचे वार्षिक / आधारभूत वर्षाचे निश्चितीकरण, परवानाधारकाने प्रदान करणे.<br><br>परंतु असे की, परवानाधारकाकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून केलेल्या अर्जामुळे अथवा आयोगाने स्व-मताने असे निश्चितीकरण केले तरी हे शुल्क देय आहे. | रु. १५,००,०००/- अधिक<br>रु. १,००,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणीसाठी |
| १४ | कलम ६२ उप-कलम (१) च्या खंड (सी) च्या तरतुदीखाली वीजेच्या वहनासाठीच्या दराचे वार्षिक / आधारभूत वर्षाचे निश्चितीकरण, परवानाधारकाने प्रदान करणे.<br><br>परंतु असे की, परवानाधारकाकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून आलेल्या अर्जामुळे अथवा आयोगाने स्व-मताने असे निश्चितीकरण केले तरी हे शुल्क देय आहे. | रु. ५,००,०००/- अधिक<br>रु. १,००,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणीसाठी |

| | | |
|---|---|---|
| १५ | कलम ६२ उप-कलम (१) च्या खंड (डी) च्या तरतुदीखाली विजेच्या किरकोळ विक्रीसाठीच्या दराचे वार्षिक / आधारभूत वर्षाचे निश्चितीकरण, परवानाधारकाने प्रदान करणे.<br><br>परंतु असे की, परवानाधारकाकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून आलेल्या अर्जामुळे अथवा आयोगाने स्व-मताने असे निश्चितीकरण केले तरी हे शुल्क देय आहे. | रु. ५,००,०००/- अधिक कमाल रु.२०,००,०००/- पर्यंत उच्चतम मागणीच्या प्रति एमव्हीएसाठी रु. ५००/-, अधिक रु. १,००,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणीसाठी |
| १६ | बहु-वर्षीय दर चौकटीच्या अंतर्गत नियंत्रण कालावधीत वीज दराचा आणि परवानाधारकाच्या कामगिरीचा वार्षिक आढावा, परवानाधारकाने प्रदान करणे. | रु. ५,००,०००/- अधिक<br>रु. १,००,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणीसाठी |
| १७ | परवानाधारकाकडून वीज दर आदेशाचा किंवा वीज खरेदी कराराचा किंवा वीज प्राप्तीच्या दराचा, पुर्नविलोकन करण्यासाठी अर्ज | दर निश्चितीकरणासाठीच्या मूळ अर्जाचे वेळी अदा केलेल्या शुल्काच्या १० टक्के अधिक<br>रु. ५०,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणीसाठी |
| १८ | ग्राहकाकडून/ ग्राहक प्रतिनिधीकडून वीज दर आदेशाचा किंवा वीज खरेदी कराराचा किंवा वीज प्राप्तीच्या दराचा, पुर्नविलोकन करण्यासाठीचा अर्ज | रु. २५,०००/- |
| १९ | परवानाधारक किंवा ग्राहक/ ग्राहक प्रतिनिधी सोडून इतर कोणत्याही व्यक्तीचा वीज दर आदेशाचा किंवा वीज खरेदी कराराचा किंवा वीज प्राप्तीच्या दराचा, पुर्नविलोकन करण्यासाठीचा अर्ज | रु. १,००,००० /- अधिक<br>रु. ५०,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणीसाठी |
| २० | अधिनियमाच्या कलम ४५ आणि कलम ४६ खाली वितरण परवानाधारकाच्या आकारांच्या सूचीला मंजूरी देण्यासाठीचा अर्ज | रु. १,००,०००/- अधिक<br>रु. ५०,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणीसाठी |

| | | |
|---|---|---|
| २१ | या विनियमांखाली अन्यत्र समाविष्ट नसलेल्या, परवानेधारक व विद्युत निर्मिती कंपन्या आणि परवानेधारकांच्या आप-आपसांतील वादांबाबत, कलम ८६च्या उप-कलम (१) च्या खंड (एफ) खालील अभिनिर्णय | रु. ५,००,०००/- अधिक<br>रु. ५०,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणीसाठी |
| २२ | अधिनियमाच्या कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (एफ) खाली देण्यांत आलेल्या आदेशाचा पुर्नविलोकन करण्यासाठीचा अर्ज | मूळ आदेशासाठी दिलेल्या शुल्काच्या १० टक्के अधिक<br>रु. ५०,०००/- आयोगाच्या मुख्यालयाच्या बाहेरील सुनावणीसाठी |
| २३ | आयोगाचे आदेश / अभिलेख्यांचे निरीक्षण करण्यासाठीचा अर्ज | प्रति दिवशी किंवा त्याच्या भागासाठी रु. १००/- |
| २४ | आयोगाचे दस्तऐवज / आदेश यांच्या प्रती पुरविण्यासाठी | प्रत्येक पृष्ठासाठी रु. २/- |
| २५ | या विनियमांत अन्यत्र समावेश न झालेल्या आयोगाच्या आदेशांचा पुर्नविलोकन करण्यासाठीचा अर्ज | रु. १०,०००/- |
| २६ | या विनियमांत अन्यत्र समावेश न झालेले असे संकीर्ण अर्ज -<br>(अ) परवानेधारकांचे अर्ज<br>(ब) व्यक्ती सोडून इतरांचे अर्ज<br>(क) वैयक्तिक अर्ज | <br><br>रु. १०,०००/-<br>रु. १,०००/-<br>रु. ५००/- |
| २७ | संकीर्ण अर्ज या वर्गवारीत न येणारा महाराष्ट्र शासनाकडून अर्ज | रु. ५,०००/- |

**मुंबई,**
**दिनांकः ३ डिसेंबर, २००४**

**ए. एम. खान,**
**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**